**कृपया प्रसिद्धीसाठी** **28 डिसेंबर 2010**

## ‘ मत्स्यदुष्काळ जाहीर करा, डिझेलचा परतावा सुरु करा ’ : राम नाईक

**मुंबई, मंगळवार :**"नुकत्याच पार पडलेल्या मत्स्यगंधा महोत्सवात केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांनी केलेले वक्तव्य गंभीर स्वरुपाचे असून महाराष्ट्रातील मच्छिमारांच्या हितासाठी स्वतः त्यांनी तसेच राज्य सरकारने तातडीची उपाययोजना करण्याची गरज आहे. सर्व प्रथम राज्यात मत्स्य दुष्काळ जाहीर करावा आणि डिझेलचा परतावा पुन्हा सुरु करावा," अशी मागणी माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक व भाजपा महाराष्ट्र मच्छिमार आघाडीचे संयोजक श्री. राजन मेहेर यांनी केली आहे.

मत्स्यगंधा महोत्सवाचे उद्घाटन करताना स्वतः श्री. शरद पवार यांनी आपल्या भाषणात स्पष्ट कबुली दिली की गुजरात, पश्चिम बंगाल, केरळ आदी राज्यांतील मत्स्य उत्पादनात 6 टक्के वाढ झाली असली, तरी महाराष्ट्रात मात्र मत्स्य उत्पादनात सहा टक्के घट झाली आहे. श्री. पवारांच्या या वक्तव्याकडे लक्ष वेधत श्री. नाईक म्हणाले,‘‘राज्यातील मत्स्य उत्पादन घटत आहे याकडे आम्ही वेळोवेळी लक्ष वेधूनही सरकारने कोणतीही उपाययोजना केली नाही. निदान आता तरी मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छिमारांना खरा दिलासा देण्याचे काम सरकारने करावे."

श्री. राम नाईक यांनी ते पेट्रोलियम मंत्री असताना मच्छिमारांना मच्छिमारी बोटींसाठी लागणा-या डिझेलवर मिळणारा परतावा वाढवून प्रति लिटर रु. 1.50 केला होता. डिझेल - पेट्रोलच्या वाढलेल्या किंमती लक्षात घेऊन हा परतावा वाढविण्याची मागणी वेळोवेळी करुनही कृषिमंत्री श्री. शरद पवार आणि पेट्रोलियम मंत्री श्री. मुरली देवरा यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर वरकरणी तो वाढवून रु.3 केल्याचा आव आणला मात्र हा परतावा फक्त दारिद्र्य रेषेखालील मच्छिमारांनाच देण्याचा निर्णय घेतला. दारिद्र्य रेषेखालील मच्छिमारांकडे मच्छिमारीसाठी स्वतःची बोटच असणे शक्य नाही हे उघड आहे. परिणामतः हा परतावा केंद्र सरकारने बंदच केल्यात जमा आहे. तो पुन्हा सुरु करावा,"अशी मागणीही श्री. राम नाईक व श्री. राजन मेहेर यांनी केली.

‘‘गुजरात मधील मत्स्य उत्पादन वाढले आहे कारण तिथे मासेमारी बंदरांचा पद्धतशीर विकास करण्यात येत आहे. आम्ही गेली पाच वर्षे महाराष्ट्रातील बंदरांचा विकास करा अशी मागणी करीत आहोत. परंतु राज्य सरकार व केंद्र सरकार त्याकडे साफ दुर्लक्ष करीत आहे. मत्स्यगंधा महोत्सवाला मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण व उद्योग मंत्री श्री. नारायण राणे हेही उपस्थित होते. आता तरी संयुक्तपणे सातपाटी, अर्नाळा, करंजा, देवगड, मीरकरवाडा, आगरदांडा, साखरीनाते, हरणे, आदी राज्यातील मासेमारी बंदरांचा योजनाबद्ध आणि अग्रक्रमाने विकास करण्यास सुरुवात करावी," असेही श्री. नाईक व श्री. मेहेर म्हणाले.

मत्स्य उत्पादनातील घट लक्षात घेऊन मच्छिमारांना मदतीचा हात देण्याची गरज आहे. मासेमारी म्हणजे समुद्रावरील शेती मानली जाते. त्यामुळे मच्छिमारांनाही शेतक-यांप्रमाणेच 4 टक्के व्याज दराने कर्ज देण्याची सोय करावी तसेच बर्फाच्या कारखान्यासाठी करण्यात येणा-या वीज पुरवठ्यावरील अनुदान 40 पैशांवरुन वाढवून रु. 1.40 करावे, अशी मागणीही करीत असतानाच श्री. नाईक म्हणाले,‘‘सीआरझेडच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे मच्छिमारांच्या हिताचे आहे. ती झालीच पाहिजे, मात्र त्याचवेळी मच्छिमारांची घरेही सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारने विशेष प्रयत्न केले पाहिजेत. यासंबंधी विस्तृत विवेचन मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे नवे नियम 15 दिवसात आल्यानंतरच करणे शक्य आहे."

मत्स्यगंधा महोत्सव झाला. आता उपाययोजना करुन मच्छिमारांना मदतीचा हात अधिक विलंब न लावता केंद्र व राज्य सरकारने द्यावा, असे आवाहनही पत्रकाच्या शेवटी श्री. राम नाईक व श्री. राजन मेहेर यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**